## मनोगत

माझ्या काही कवितांचा संग्रह, 'उद्ध्वस्त अवशेष' आता उशिरा प्रकाशित होतो आहे. उशिरा म्हणण्याचं कारण या बहुतेक सर्व कविता १९३५ ते १९८० या काळात मी लिहिलेल्या आहेत. साहजिकच कवितांना तत्कालीन मानसिकतेचे कवीच्या अपरीपक्कतेचे संदर्भ चिंकटले असणार हे स्पष्ट आहे. म्हणून हे ना ते कारण दाखवून काव्यसंग्रह करणे मी टाळत होतो, आता सुद्धा माझी मानसिक अवस्था, 'मोले घातले रडाया आणि अगं अगं म्हशी' च्या मध्ये कुठेतरी चाचपडते आहे. कविता हे माझे पहिले प्रेम आहे. पण ललितगद्य, वैचारिक लेखनाच्या आवेगात कवितेशी आमचा कधी प्रेमभंग झाला हे कळलेच नाही. आपल्यातला कवी जपण्यात जोपासण्यात मी खूपच कमी पडलो आहे, याची केवळ सल काय कामाची? कवितेची भाषा कमावणे, कवितेच्या आकृती बंधाच्या रचनेचा आवाका प्राप्त करणे, काव्य विषयाचे सखोल सलग चिंतन करणे या सर्वच अंगांची हेळसांड माझ्याकडून झाली आहे. हे हा संग्रह पाहताना जाणकारांना जाणवले नाही तरच नवल.

मी माझ्या आजवरच्या वाचनात इतक्या चांगल्या, दिर्घकाळ खोलकर वाचक मनावर प्रभाव टाकणाऱ्या विविध भाषांतल्या कविता वाचल्या आहेत की त्यांचे स्मरण होताच माझे अपराधीपण अधिक

# उ ध्व स्त अ व शे ष

## कोंभ

तरारून उठलाय कोंभ
हिरवा नाजूक रसरशीत
त्याला ठेचण्यासाठीच
वखवखलीय
नजर विखारी बटबटीत

उ
ध्व
स्त
अ
व
शे
ष

## घागर

माझ्या मनाची घागर
पोचे येवून भळभळतेय
थेंबा सवे थेंब
अखंड पाझर फुटलाय
आतला जीवनरस मात्र
अजून तसाच आहे
माझ्या मनाची घागर
रिती होतानाच भरतेय